Navshakti

# Cholamandalam Invest Q2 net up 27% to Rs 120 crore

Date: 04/11/2015 | Edition: Mumbai | Page: 22 | Source: Bureau | Clip size (cm): W: 8 H: 5



## चोलामंडलम गुंतवणूक आणि वित्त कंपनीला तिमाहीत करपश्चात नफा १२० कोटी रु.

मुंबई, चोलामंडलम गुंतवणूक आणि वित्त कंपनीला ३० सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत करपश्चात नफा १२० कोटी रु. झाला असून नफ्यात २७ टक्के वाढ झाली आहे. तर सहामाहीत करपश्चात नफा २३१ कोटी झाला असून त्यात गतवर्षीपेक्षा २३ टक्के वाढ झाली आहे. कंपनीच्या संचालक मंडळाने ३० सप्टेंबर २०१५ रोजी संपलेल्या सहामाहीचे लेखापरीक्षा केलेले आर्थिक निकाल आणि ३० सप्टेंबरला संपलेल्या तिमाहीचे लेखापरीक्षा केलेले आर्थिक निकाल मंजूर केले.